

मला वाचायला आवडतं

# हिक! कोपोटॅमस



गीता धर्मराजन
अतानु रॉय यांची चित्रे




कथाचे ३००एम थिंकबुक

एके दिवशी भर दुपारी गुलमोहर जंगलातल्या लिलीच्या हौदात एक अतिप्रचंड काहीतरी पडलं.


धाप्प!





एकच गोंधळ झाला!.....



मुयाल ससा, हनु माकड,
पप्पू पोपट सगळे जण
ओरडायला लागले...




सगळे जण इतके घाबरले होते की, त्या हौदातून बाहेर चालत कोण येत आहे हेही त्यांनी पाहिलं नाही. मुयालचं त्याकडे पहिल्यांदा लक्ष गेलं.






या सगळ्या आवाजामुळे झोपमोड झालेलं रात्री घुबडानं विचारलं.

असं विचारताच, हवासीला रडू कोसळलं.
“म... मला...घ...घरी, पर...हिक... जायचंय.”
तो दोन्ही पाय आपटत कळवळून म्हणाला.




पण तू इथं
कसा आलास?
एला सुरवंटानं विचारलं.


भा र त
आ फ्रि का


मी माझ्या आईसोबत होतो. अचानक मला उचकी लागली आणि हिक - स्सू...प्प...! मी हवेत गेलो!
माझ्या आईलाही मला थांबवता आलं नाही. मावशांना थांबवता आलं नाही. माझ्या बलदंड बाबांनाही ते जमलं नाही.
आणि मी इथं आलो! मला भीती वाटतेय, की मला अजून एक मोठ्ठी उचकी लागली तर काय होईल! मी पुन्हा उडून जाईन आणि कदाचित कधीच खाली येणार नाही!
आजुबाजूच्या प्राण्यांकडे पाहत त्यांने एका दमात सगळं सांगितलं.




“तुझ्या उचकीवर कायमस्वरुपी उपचार करायला
आम्ही तुला मदत करू.!” मुया मदत करण्याच्या
हेतूनं म्हणाला.
“आणि मी घरू जाऊ शकेन?” हवासी काहीसा
आनंदून म्हणाला.
“नक्की. आपण प्रयत्न करू या.”, हनु म्हणाला. “चला,
आपल्या मित्रांनासुद्धा बोलवू या! कुणीतरी
आपल्याला उचकीवरचा रामबाण उपाय सांगू
शकेल!”
मुयाल तातडीने हाथी-लोग, वाघ, वटवाघळे, कोळी
अशा सगळ्यांना बोलवायला निघाला.

लवकरच, ते सगळे विचार करू लागले.
“पाणी!”, फॉरेस्ट कोल्हा अचानक म्हणाला.
“आम्हा कोल्ह्यांना उचकी लागते तेव्हा आम्ही
पाणीच पितो. त्याने उचकी लगेच थांबते!”

“धन्यवाद!” हवासी म्हणाला.
“पाणी मला प्रचंड आवडतं!”

तो तडक लिलीच्या हौदात गेला...
आणि क्षणार्धात पाण्याखाली
अदृश्य झाला.



बराच वेळ तो बाहेर न आल्यामुळे
“अरे! तो बुडाला की काय?”
असं ई हत्तीनं विचारलं.


“त्याला पोहता येत असेल असं वाटत नाही बुवा”,
का-का कावळा चिंतेच्या स्वरात म्हणाला.
आणि तेवढ्यात हवासी हसत हसत बाहेर आला




“व्वा, हे अगदी घरच्यासारखं होतं!” हवासी आनंदानं फुरफुरत म्हणाला.
“आणि मी विसरूनच गेलो आणि थोडा फेरफटका मारला! सॉरी!”
“फेरफटका! पाण्याखाली?” ई हत्तीनं आश्चर्यचकित होऊन विचारलं.

“मला तलावाच्या तळावरून चालत जायला खूप आवडतं.”, हवासी म्हणाला.
“मी खूप छान पोहू शकतो! एवढंच नाही तर मी तुम्हाला जमिनीवरच्या शर्यतीतसुद्धा हरवू....”


तेवढ्यात...




सगळ्या प्राण्यांनी हवासीची उचकी घालविण्यासाठी सगळे प्रयत्न केले.



....त्याला साखर दिली...



त्याला श्वास रोखून धरायला सांगितलं...



... आणि घाबरवलंसुद्धा!

पण हवासी स्वतःच इतका अगडबंब होता. तो कशाला घाबरणार?

**त्यानंतर...**






तेजस वाघ जेव्हा असं म्हणाला तेव्हा हनु कपाळावर हात मारत म्हणाला, “अरेरे! आपण हा विचारच केला नाही!”

“आपल्याला खरं तर त्याला एक मोठी उचकी द्यायला पाहिजे. अशी उचकी जी त्याला त्याच्या घरी पोहोचवेल, म्हणजे तो ज्या मार्गाने आला त्याच मार्गाने परत!”, पोपट एका दमात म्हणाला.




“आपण त्याला गुदगुल्या करू या!”, मुंग्यांनी आपलं मत दिलं. “आपण त्याला इतके भारी विनोद सांगू या की, तो थेट घरीच पोहोचला पाहिजे!”, माकडं म्हणाली. “भारीच!”, हवासी जवळपास किंचाळलाच, त्याच्या डोळ्यांमध्ये एक चमक आली. “आई, मी येतोय!”





मुंग्यांनी हवासीला गुदगुल्या केल्या.

आणि प्रत्येक जण त्यांना माहीत असलेले जोक आणि मजेदार कोडी सांगू लागला.

सात फुटांचा गोरिला कुठे झोपतो?

जिथे त्याला वाटेल तिथे!

बगळा एका पायावर का उभा राहतो?

त्याने दोन्ही पाय उचलले तर तो पडेल की!

हिप्पोएवढं अगडबंब पण वजन मात्र काहीच नाही, असं काय असतं?


हिप्पोची सावली!

बेडूक त्यांचे पैसे कुठे ठेवतात

रिव्हर बँकमध्ये

माकडं, हत्ती, सुरवंट आणि पक्षी हसून लोटपोट होत होते!


त्यांच्या मध्यभागी हवासी होता. तो मोठमोठ्याने हसत होता. त्याने इतके विनोद या पूर्वी कधीच ऐकले नव्हते.



आणि हत्तीच्या एका विनोदाच्या मध्येच हवासीला आली उचकी! एक मोठ्ठी उचकी, हिप्पोच्याच आकाराएवढी



# हिक!



आणि तो उडाला, वडाच्या झाडावरून, जिथून तो आला होता. “टाटा आणि धन्यवाद! हिप्पो आकाशातून उडता उडता जोरात ओरडला.

“बाय, बाय!
हॅप्पी लँडिंग”
सगळे प्राणी मोठ्यांदा
ओरडले.

# घरी परत!



आणि हो, मी विसण्यापूर्वी. कालच गुलमोहर जंगलातील प्राण्यांना आफ्रिकेतल्या एमझिमा स्प्रिंग्समधून मोठ्या “थँक यू” चा डुरकल्याचा आवाज आला.

हो, तुमचा अंदाज बरोबर आहे! ते डुरकणं हवासी या हिक्कोपोटॅमसचं होतं!

# कोण असेल बरं?

त्याचं नाव म्हणजे पाणघोडा. तो डुकरासारखा दिसतो. तो अगडबंब, जाड आणि अवजड असतो (त्याचं वजन तुम्ही आणि तुमच्यासारख्या २०० हून अधिक जणांना एकत्र केल्यावर जेवढं वजन होईल, तेवढं असतं!), पण तो तुमच्यापेक्षा वेगात धावू शकतो आणि सुंदर पोहू शकतो. ओळखलं का तुम्ही? तो आहे

# हिप्पोपोटॅमस अर्थात!





हिप्पोच्या पाठीवरची आणि बाजूची त्वचा तुमच्या चार बोटांएवढी जाड असते आणि म्हणूनच त्याला कोणत्याही प्राण्याची भीती वाटत नाही. याला अपवाद बहुधा पूर्ण वाढ झालेल्या सिंहाचा आहे.

हिप्पोचं तोंड इतकं मोठं असतं की, तुम्ही त्यात सहज चालत जाऊ शकता - म्हणजे तुम्हाला तसं जायला आवडणार नाही! हिप्पो हे शांत असतात मैत्रीपूर्ण असतात, फक्त त्यांच्या वाटेला जायचं नाही. कारण हिप्पो रागावला तर तो एक अख्खी बोट आपल्या जबड्याने फाडून टाकू शकतो.

हिप्पोचं तोंड इतकं मोठं असतं की, तुम्ही त्यात सहज चालत जाऊ शकता - म्हणजे तुम्हाला तसं जायला आवडणार नाही! हिप्पो हे शांत असतात मैत्रीपूर्ण असतात, फक्त त्यांच्या वाटेला जायचं नाही. कारण हिप्पो रागावला तर तो एक अख्खी बोट आपल्या जबड्याने फाडून टाकू शकतो.
हिप्पोंना आफ्रिकेतील नद्यांमध्ये दिवसभर डुंबायला आवडते. काही वेळा ते नदीच्या पात्रात पाण्याखालून चालत जातात आणि आपल्या अजस्त्र तोंडात पाणथळ वनस्पती भरून घेतात (ते शाकाहारी असतात). पाणी त्यांच्या फुफ्फुसात जाऊ नये यासाठी त्यांच्या नाकपुड्यांवर त्वचेचे खास स्तर असतात.

हिप्पोची पिल्लं पाण्याखालीच जन्मतात आणि चालण्याआधी ती पोहू लागतात! एका वेळी फक्त एकच पिल्लू जन्माला येतं. बाळ जेव्हा चालू लागतं तेव्हा तो किंवा ती आपल्या स्वतःच्या साहसी सफरीला सुरुवात करतात. पण पिल्लांची आई मात्र हळूच त्यांना ढोसतात. हिप्पोची पिल्लं आपल्या आईकडूनच धोक्यांपासून लांब कसं राहावं, अन्न कसं शोधावं आणि मजा कशी करावी हे शिकतात.





**गीता धर्मराजन** यांना मुलांसाठी गोष्टी लिहिणे आवडते. त्या टारगेट या बालनियतकालिकाच्या संपादकांपैकी एक होत्या, तसेच पेन्सिल्व्हेनिया विद्यापीठातील पेन्सिल्व्हेनिया गॅझेट नियतकालिकाच्या संपादिका होत्या. साहित्य आणि शिक्षणक्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना २०१२ साली पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**अतानु रॉय** यांच्या नावावर १०० हून लहान मुलांसाठीची पुस्तके आहेत. त्यांची सृजनशीलता त्यांनी बालसाहित्यासाठीच वापरली आहे. रॉय यांचा बोल्ड रंगांचा आणि बारीकसारीक तपशील यामुळे वाचकांचे हृदय आणि लक्ष वेधून घेतात. एके काळी ते इंडिया टुडेमध्ये राजकीय व्यंगचित्रकार म्हणू करत होते. पुस्तकांतील इलस्ट्रेशन्ससाठी चिल्ड्रन्स चॉइस (मुलांची निवड) पुरस्कार आणि इलस्ट्रेशन्ससाठी इबी (IBBY) सन्मानपत्र मिळाले आहे. त्यांचा स्टुडियो गुरगावमध्ये आहे.

## KATHA


कथा ही जागतिक पातळीवरील मान्यताप्राप्त स्वयंसेवी संस्था (www.katha.org) आहे. ही संस्था १९८८ सालापासून साक्षरतेपासून ते साहित्यापर्यंत विविध क्षेत्रांत अविरतपणे काम करत आहे. प्रकाशन आणि गरीब मुलांच्या शिक्षणासाठी काम करण्याचा आमचा सुमारे ३० वर्षांचा अनुभव आहे.

“भारताच्या शिरपेचातील शैक्षणिक हिरा.” **- नाओयुकी शिनोहारा, व्यवस्थापकीय उपसंचालक, आयएमएफ**

“कथा हा जगभरातील कल्पक प्रकल्पांसाठी एक आदर्श उदाहरण आहे, जो शहरातील सामान्य व नाट्यमय व्यथांना टिपतो.”
**- चार्ल्स लँड्री, द आर्ट ऑफ सिटी मेकिंग**

“कथाला मुलांबद्दल ममत्व आहे. म्हणूनच ही संस्था मुलांसाठी इतकी सुंदर पिक्चर बुक्स म्हणजेच चित्रपुस्तके तयार करते” **- टाइम आउट**

“मुले ही कथाच्या पुस्तकांमध्ये जसा बदल घडवतात तसा त्यांच्या समुदायामध्ये शाश्वत आणि प्रत्यक्ष बदल घडवू शकतात, या संकल्पनेवर कथाचे काम आधारलेले आहे” **- पेपरटायगर्स**



प्रथम आवृत्ती वर्ष २०२१
कॉपीराइट © कथा, १९९१, २०१४, २०२१
मजकूर कॉपीराइट © गीता धर्मराजन
इलस्ट्रेशन कॉपीराइट © कथा
ए३, सर्वोदय एन्क्लेव्ह, श्री अरबिंदो मार्ग, नवी दिल्ली ११००१७
फोन: ९१-११ ४१४१ ६६००. ४१४१ ६६१०
ई-मेल: editors@katha.org, Website: www.katha.org
ISBN 978-93-82454-65-6

**आमचे मिशन :** प्रत्येक मूल उत्तम वाचेल आणि मजेसाठी वाचेल!

कथा ही नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था असून ही संस्था १९८८ साली सुरू झाली. आम्ही साक्षरतेपासून ते साहित्यापर्यंतच्या क्षेत्रात अविरत काम करत आहोत. मुलांमध्ये आणि प्रौढांमध्ये वाचनाची आवड वृद्धिंगत व्हावी यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, आम्ही गरीबीत जगत असलेल्या १,००,००० मुलांसोबत काम करत असून दर्जेदार पुस्तके आणि इतर प्रयत्नांच्या माध्यमातून त्यांना श्रेणी पातळीवर आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत.

सर्व हक्क आरक्षित. प्रकाशकाच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय या पुस्तकातील कोणताही भाग पुनरुत्पादित केला जाऊ नये किंवा कोणत्याही प्रकारात वापरुन नये.
या पुस्तकांच्या विक्रीमधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा १०% भाग वंचित विद्यार्थ्यांच्या वाचनासाठी आणि आयुष्यभराच्या अध्ययन कार्यक्रमांना सहाय्य करण्यासाठी देण्यात येतो.




आय लव्ह रीडिंग लायब्ररी ही पुस्तकांची एक वैशिष्ट्यपूर्ण मालिका आहे. या लायब्ररीच्या माध्यमातून नव्या आणि वाचनाबद्दल एक प्रकारचा न्यूनगंड असलेल्या वाचकांना सातत्यपूर्ण वाचनासाठी प्रोत्साहित करण्यात येते. वेगेवगळ्या पातळ्यांवर असलेल्या मुलांच्या अध्ययन गरजांनुसार उत्तम दर्जाचा आणि सुंदर डिझाइन असलेला कंटेन्ट उपलब्ध करून देण्यात येत आहे. या माध्यमातून भारत आणि जगातील उत्तम साहित्यकृती सादर करण्यात येत आहेत. आमच्या पुस्तकांमध्ये गीता धर्मराजन यांचे स्टोरीपेडॅगॉगीTM (कथाअध्ययनशास्त्र) समाविष्ट करण्यात आले आहे, जे विशेषतः पहिल्या पिढीतील वाचकांमध्ये वाचनाच्या आनंदाचा प्रसार करते, आणि मुलांना मोठ्या कल्पना आणि जादुई जगात घेऊन जाते! (विचार करा, विचारा, चर्चा करा, कृती करा आणि साध्य करा).


कथाज होलिस्टिक अर्ली लर्निंग (खेल) प्रयोगशाळेच्या माध्यमातून सरकारी, स्वयंसेवी संस्थांमधील आणि खासगी शाळांमधील शिक्षकांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात येतात. या F2F (फेस टू फेस) कार्यशाळा असतात आणि त्यांना ऑनलाइन सत्रांची जोड दिलेली असते. या कार्यशाळेत शिक्षकांना, शाळा प्रशासकांना आणि स्वयंसेवकांना रीडिंग टीचर्स प्रमाणपत्र प्राप्त होते. अधिक माहितीसाठी 300m@katha.org या ईमेलवर संपर्क साधावा.

## ही सर्व आयएलआर पुस्तके

मनोरंजनात्मक आणि अर्थपूर्ण वाचन करा

इन द ग्रीन सीरिज


































FOR OUR BOOKS

www.books.katha.org

“कथा... भारतीय प्रकाशन इतिहासातील एक खास आणि वैशिष्ट्यपूर्ण चळवळ.”
- द आयकॉनिक इकोनॉमिक टाइम्स

मुलांसाठी
'कथा'चे पुस्तक
ISBN 978-93-88284-81-3
9 789388 284813
www.katha.org
₹ xxx